तरुण भारत संवाद ■ बुधवार, २५ जानेवारी २०२३

# अभ्यासाबरोबर खेळालाही महत्व द्या!

## नगराध्यक्ष चेतन चव्हाण यांचे आवाहन : दोडामार्ग महाविद्यालयात क्रीडा महोत्सव

वार्ताहर
दोडामार्ग

शिक्षण आणि खेळ याचे महत्व खूप मोठे आहे. आपल्या सर्वांगीण विकासासाठी खेळणे हे महत्वाचे आहे. याने आरोग्य देखील सुदृढ राहते, असे मत नगराध्यक्ष चेतन चव्हाण यांनी व्यक्त केले.

लक्ष्मीबाई सीताराम हळबे महाविद्यालयात आयोजित केलेल्या क्रीडा महोत्सव कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर नगरसेवक चंद्रन उर्फ रामराव गावकर, प्राचार्य डॉ. सुभाष सावंत, प्रा. डॉ. संजय खडपकर, पत्रकार समीर ठाकुर उपस्थित होते.

रामराव गावकर म्हणाले, आपण जे खेळ खेळतो त्यात पूर्णपणे झोकुन खेळावे. यासाठी मुलांना प्लॅटफॉर्म उपलब्ध असणे देखील तितकेच महत्त्वाचे आहे. प्राचार्य डॉ. सावंत यांनी सांगितले की जर सातत्यता असेल तर कोणत्याही कामात आपण यशस्वी होऊ शकतो. त्यामुळे खेळातही सातत्य ठेवणे आवश्यक आहे. पोलीस भरती ट्रेनिंगसाठी या महाविद्यालयातील २७ मुले क्रीडामार्फत तयारी करत आहेत. या कार्यक्रमाच्या सुरुवातीला कु. गौरवी सावंत हीने क्रीडा प्रतिज्ञा सादर केली.

प्रास्ताविक डॉ. संजय खडपकर, सूत्रसंचालन कु. साक्षी गवस व आभार कु प्रतिज्ञा नाईक यांनी मानले.



दोडामार्ग : हळबे महाविद्यालयातील क्रीडा महोत्सवात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना नगराध्यक्ष चेतन चव्हाण. सोबत प्रा. डॉ. सुभाष सावंत, समीर ठाकुर व अन्य.